# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, 3 रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - 400 614.
दिनांक 20 ऑक्टोबर 2016.

## <u>-: विशेष सभेची नोटीस :-</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूचीच्या प्रकरण 2 मधील नियम 1 (क), (ड) व (ह) अन्वये मा. महापौरांना असलेल्या अधिकारानुसार <u>नवी मुंबई महानगरपालिकेची विशेष सभा, मंगळवार, दिनांक 25 ऑक्टोबर 2016 रोजी दुपारी 12.00 वाजता,</u> बेलापूर, भुखड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील <u>राजमाता जिजाऊ सभागृह</u> येथे खालील विषयावर विचार करण्यासाठी भरेल :-

1. मा. स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्षरीसह मा. महापौर यांचे दिनांक 20/10/2016 रोजीचे सचिव कार्यालयास प्राप्त झालेले पत्र

   "मा. महापौरांच्या आदेशानुसार 1) श्री. शिवराम परशुराम पाटील, 2) श्री. जयवंत दत्तात्रेय सुतार, 3) श्री. विनोद विनायक म्हात्रे, 4) श्री. काशिनाथ वामन पवार, 5) श्रीम. मीरा संजय पाटील, 6) श्री. जगदीश नाना गवते, 7) श्री. प्रशांत धनाजी पाटील, 8) श्री. अशोक बाबूराव गुरखे, 9) श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, 10) श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील, 11) श्रीम. भारती मंगळ्या कोळी, 12) श्रीम. छाया केशव म्हात्रे, 13) श्रीम. संगिता अशोक पाटील, आणि 14) श्री. मनोहर कृष्णा मढवी यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त, श्री.तुकाराम मुंढे यांनी नवी मुंबई महानगरपालिकेचा पदभार स्वीकारल्यापासून ते आतापर्यंत त्यांनी नवी मुंबईचे महापौर व नगरसेवक यांचा अवमान करणे, महासभा व स्थायी समितीच्या अधिकारावर गदा आणणे, धोरणात्मक विषय महासभेत न आणता आपल्या अधिकारात परस्पर अंमलबजावणी करणे, जनतेच्या मनात नगरसेवकांविषयी हेतुपुरस्कर रोष निर्माण करणे, लोकनियुक्त सदस्यांना अपमानीत करणे, त्यांना सुडबुध्दीने वागणुक देणे, मुलभूत नागरी सुविधांबाबतची अकार्यक्षमता, हेकेखोर व मनमानी कार्यपध्दती, लोकशाही पध्दतीने काम न करता हुकूमशाही पध्दतीने काम करणे. तसेच स्थायी समिती व महासभेला अपवाद वगळता हजर न राहणे. अशा कार्यपध्दतीतून त्यांची गैरवर्तणुक व बेजबाबदारपणा आणि कर्तव्यात हयगय केलेली आहे. त्यामुळे मा.श्री. तुकाराम मुंढे, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 36 (3) अन्वये अविश्वास ठराव दाखल करणेबाबत पत्र सादर केले आहे, त्यावर विचार विनिमय करणे."

मा. महापौरांच्या आदेशावरून,

सही/-
(चित्रा बाविस्कर)
महापालिका सचिव,
नवी मुंबई महानगरपालिका.

महापालिका सचिव कार्यालय,
नवी मुंबई महानगरपालिका,
दिनांक 20 ऑक्टोबर 2015.